# Yashottam Janhit Pratishthan

## Yearly Program & Media Coverage

## 13th December 2025 : Blood donation camp

"Yashottam Janhit Pratishthan" arranges blood donation camp every year. 13th December 2025 there was blood donation camp arranged in pune blood bank, Malwadi, Hadapsar, Pune. Several citizens participated in this blood donation camp.









प्रभात

19 Dec 2025

### यशोत्तम जनहित प्रतिष्ठानचे रक्तदान शिबिर

मुंढवा, दि. १८ (प्रतिनिधी) - मुंढवा येथील यशोत्तम जनहित प्रतिष्ठान व विभा-गिरीश ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने पुना ब्लड बँक येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. नागरिकांनी सामाजिक बांधीलकी जपत उत्स्फूर्तपणे या शिबीरात सहभाग घेतला. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे व ट्रस्टचे अध्यक्ष गहिनीनाथ हुमे यांनी विशेष परिश्रम घेतले. रंगराज हुमे, प्रथमेश गिरमे, रंजना हुमे, शेषराव साळवे, अनिकेत गागडे, महेश पोतदार, गणेश गायकवाड, अनिल भांडवलकर आदी यावेळी उपस्थित होते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामाजिक संस्थांच्या माध्यमातून वेळोवेळी रक्तदान शिबीरे घेणे आवश्यक आहे, असे नितीन वाबळे यांनी सांगितले.

Pune City Edition
Dec 19, 2025 Page No. 16
Powered by: erelego.com

# 30th Sept 2025 : Distribution of the free grocery materials to needy and poor Families

On behalf of Yashottam Janhit Pratishthan, free grocery materials were distributed to the needy and poor families in telugu vasti here. Families here have come to pune in search of employment. His stomach gets bread only after working every day. Free food items were distributed as relief to such citizens.





## 13th December 2023 : Blood donation camp

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges blood donation camp every year. 13th December 2023 there was blood donation camp arranged in pune blood bank, Malwadi, Hadapsar, Pune. Several citizens participated in this blood donation camp.







सकाळ 18 Dec 2023

### यशोत्तम जनहित प्रतिष्ठानतर्फे रक्तदान शिबिर

**घोरपडी :** यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने पुणे ब्लड बँक येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. परिसरातील नागरिकांनी सामाजिक बांधीलकी जपत उत्स्फूर्तपणे या शिबिरात सहभाग घेतला. या शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे व सामाजिक कार्यकर्ते गहिनीनाथ हुमे यांनी विशेष परिश्रम घेतले. रंजना हुमे, आकाश लंके, श्रीनिवास हानिगावे, विशाल शिरफुले आदी या वेळी उपस्थित होते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून आहे. ''मी दरवर्षी दोन-तीन वेळा रक्तदान करतो,'' असे शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांनी सांगितले. फिलिपिन्स येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत असलेल्या घोरपडी येथील रंगराज हुमे सुट्टीनिमित्त घोरपडी येथे घरी आला होता. त्यानेही या वेळी रक्तदान करून युवकांसाठी रक्तदान करण्याचा आदर्श घालून दिला.

## 17 April 2023 : Free distribution of clothes to needy and poor working men, women and children..

Keeping in mind the need of clothes of the needy and poor citizens of Ghorpadi, Kawadenagar, Pune, keeping in mind the need of monsoon clothes of the citizens, on behalf of **Yashottam Janhit Pratishthan**, free clothes were distributed to the men and women of Ghorpadi, Kawadenagar.






## 23  February 2023 : Organization of the program for the students of class X on the way to the exam.

Patil Estate, B. T. Kawade Road, Ghorpadi, Pune Class X students are under the pressure of studying and exams. To reduce this pressure how 10th students should approach the exam positively.  this  workshop was conducted for these students on behalf of **Yashottam Janhit Pratishtha** at Patil Estate at Kavade Road.






## 08th February 2023 : Distribution of free grocery materials to needy and poor families

Taradutt Colony, B. T. Kawade road Many needy and poor families have settled in Kawade Road, Ghorpadi, Pune for livelihood. It is a situation where their daily routine is not going without daily bargaining. In support of these families, free grocery materials were distributed on behalf of **Yashottam Janhit Pratishthan.**





# 14th December 2022 : Blood donation camp

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges blood donation camp every year. 14th December 2022 there was blood donation camp arranged in pune blood bank, Malwadi, Hadapsar, Pune. Several citizens participated in this blood donation camp.






पुढारी

18 Dec 2022

## शिबिरात बावीस जणांचे रक्तदान

**मुंढवा :** विभा-गिरीश ट्रस्ट व यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने पुना ब्लड बँक येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. परिसरातील नागरिकांनी सामाजिक बांधीलकी जपत या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमासाठी ट्रस्टचे अध्यक्ष गहिनीनाथ हुमे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे यांनी परिश्रम घेतले. या वेळी एकूण २२ जणांनी रक्तदान केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, ती एक सामाजिक बांधिलकी असल्याचे शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार राजे यांनी सांगितले.

My Pune Edition
Dec 17, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# 9 July 2022 : Free Mentoring workshop for class X Student

**"Yashottam Janhit Pratishthan"** had organized a free orientation workshop for class X student at Adarsh Madhymik Vidyalaya, Ghorpadi, Dalvinagar. During this time, the students were given guidance on competitive examinations as well as 10th standard studies.







सकाळ

पुणे, मंगळवार, १२ जुलै २०२२

## आदर्श विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**घोरपडी :** यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्यावतीने घोरपडीतील दळवीनगर येथील आदर्श माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन कार्यशाळा झाली. प्रा. रवी पिल्ले, पोलिस उपनिरीक्षक शिवाजी काटे, मुख्याध्यापक व्ही. एस. बारवकर, कोंडीबा गुजर, विकास बारवकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदी उपस्थित होते. वाचन, मनन, चिंतन व प्रकटन या चतु:सूत्रीनुसार विद्यार्थांनी अभ्यास करावा, प्रत्येक मुलामध्ये क्षमता असते. कठोर परिश्रम आणि सातत्य त्यांना यशाच्या शिखरापर्यंत पोहचविते, असे प्रा. पिल्ले यांनी सांगितले. शिवाजी काटे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Pune, HadapsarToday
12/07/2022 Page No. 5

# 24 June 2022 : Free medication for devotees in Palkhi festival

On behalf of 'Saint Dnyaneshwar Maharaj' and 'Sant Tukaram Maharaj', Palakhi the **"Yashottam Janhit Pratishthan"** has given free Medicine treatment at Hadapsar, Pune







पुढारी 25 Jun 2022

## मुंढव्यात मोफत औषध वाटप

**मुंढवा :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगदगुरू श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यामुळे शुक्रवारी सकाळी मुंढवा, घोरपडी, रामटेकडी आणि वानवडी परिसरात सगळीकडे वातावरण विठ्ठलमय झाले होते. यशोत्तम जनहित प्रतिष्ठनच्या वतीने तज्ज्ञ डॉक्टरांकडून वारकऱ्यांना आवश्यक ती औषधे मोफत देण्यात आली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, हेमंत भापकर, पार्थ वाबळे या वेळी उपस्थित होते. आम आदमी पार्टीचे तुकाराम शिंदे यांनी वारकऱ्यांची मोफत तपासणी व औषधोपचार सुविधा उपलब्ध करून दिली होती. डॉ. अभिजित शिंदे, डॉ. गणेश शिंदे यांनी तपासणी करून औषधे दिली.

My Pune Edition
Jun 25, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## 26th March 2022 : Free distribution of biscuits and Maggie packets to school children

Most of the children studying in this school live in slum areas. The examination of the children is now underway. **"Yashottam Janhit Pratishthan"** distributed Maggi and Biscuit were free of cost on behalf of for the children at home and at school.





पुढारी 30 Mar 2022

### यशोत्तम प्रतिष्ठानतर्फे खाऊचे वाटप

मुंढवा : यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने घोरपडी येथील आदर्श विद्यालय व कवडेनगर येथील मुलांना मोफत खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक व स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. एस. बारवकर, कुमार राठोड, गहिनीनाथ हुमे या वेळी उपस्थित होते. तीनशे मुलांना मॅगी पॅकेट व बिस्कीट पुडे देण्यात आले. परीक्षेच्या काळात मुलांना घरी तसेच शाळेमध्ये अल्पोपहार म्हणून खाण्यासाठी याचा उपयोग व्हावा यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

My Pune Edition
Mar 30, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## 23th December 2021 : Distribution of free sweaters to school children

There has been an increase in cold over the last few days. Schools have started and students need to have warm sweaters in school. For this purpose, Yashottam janhit Pratishthans distributed free sweaters to the students of Adarsh vidyalaya at Ghorpadi





सकाळ

पुणे, शुक्रवार,
३१ डिसेंबर २०२१

### गरजूंना स्वेटरचे वाटप

**घोरपडी, ता. ३० :** आदर्श विद्यालयातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना जरिया फाउंडेशनच्या सहकार्याने यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने मोफत स्वेटरचे वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापक व्ही. एस. बारवकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे व इतर शिक्षक या वेळी उपस्थित होते. शालेय मुलांना सहकार्य करण्यासाठी अनेक संस्था, संघटना सहकार्य करीत असतात. गरजू शालेय मुलांपर्यंत ते पोचविण्यासाठी आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे वाबळे यांनी या वेळी सांगितले.

Pune, HadapsarToday
31/12/2021 Page No. 5

# 13th December 2021 : Blood donation camp

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges blood donation camp every year. 13th Dcember 2021 there was blood donation camp arranged in Mahatma fule saansrutik Bhavan, wanwadi, Pune. Several citizens participated in this blood donation camp.





## 8 Dec 2021 : Tree Plantation

On behalf of **"Yashottam Janhit Pratishthans"**, tree were planted in Ramdara area of Loni Kalbhor on 8th Dec various evergreen trees were planted during this time.





## 27 June 2021 : Free distribution of rain clothes to needy and poor working men, women and children

The working class is leaving for work after the corona lockdown. It has been raining for the last few days. In such a situation, considering the need of rain clothes for these citizens. **"Yashottam Janhit Pratishthans"** distributed 80 rain clothes free for cost to men and women in Ghorpadi, Kawadenagar




सकाळ TODAY

पुणे, मंगळवार, ६ जुलै २०२१ ५



घोरपडी, कवडेनगर : मोलमजुरी करणाऱ्या कामगारांच्या मुलांना रेनकोट भेट देण्यात आले.

### कामगार, मुलांना मोफत रेनकोट

**घोरपडी :** जरिया फाउंडेशनच्या सहकार्याने यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने घोरपडी, कवडेनगरमधील मोलमजुरी करणाऱ्या पुरुष व महिलांना आणि लहानांना मोफत रेनकोटचे वाटप करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अजित कवडे, गहिनीनाथ हुमे, कैलास दळवी, कुमार राठोड, सुरेश औसरमल, जनार्दन घाडगे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे उपस्थित होते.

Pune, HadapsarToday
06/07/2021 Page No. 5

## 09 to 18 June 2021 : Free lunch boxes for the working class who became unemployed during the corona period

The hard working class is looking for employment after corona lockdown. There is situation where some people do not get food. There are some such families living in keshavnagar area of Ghorpadi in support of them,**“Yashottam Janhit Pratishthans”** provided free lunch boxes to these families for ten consecutive daya ( 9 June to 18 June 2021 ) in the morning and evening.





**सकाळ TODAY**

पुणे, बुधवार, २३ जून २०२१ ३

### ‘यशोत्तम’तर्फे गरजूंना मोफत जेवणाचे डबे

**घोरपडी, ता. २२ :** घोरपडी येथील कवडेनगर परिसरातील काही कुटुंबांना हॅपी क्लब फाउंडेशनच्या सहकार्याने यशोत्तम जनहित प्रतिष्ठानतर्फे दहा दिवसांपासून सकाळी व संध्याकाळी मोफत जेवणाचे डबे देण्यात येत आहे. यामुळे गरजू नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, विभा गिरीश ट्रस्टचे गहिनीनाथ हुमे, तुकाराम फांउडेशनचे कैलास दळवी यांनी या उपक्रमाचे संयोजन केले होते. हॅपी क्लबचे फांउडेशनचे कुलदीपक चौडेकर, विग्नेश अय्यर, रोहन मोरे यांचे यासाठी सहकार्य लाभले. घोरपडी गांव देवस्थान पंच मंडळाचे माजी अध्यक्ष विनायक कवडे, सामाजिक कार्यकर्ते अजित कवडे, सुरेश औसरमल, जनार्दन घाडगे आदी उपस्थित होते.

Pune, HadapsarToday
23/06/2021 Page No. 3

**पुढारी**

**19 June 2021**

### कवडेनगर येथील कुटुंबांना जेवणाचे डबे

**मुंढवा : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील लॉकडाउननंतर कष्टकरी कामगार वर्ग आता रोजगाराच्या शोधात आहे. घोरपडी येथील कवडेनगर परिसरात अशी काही कुटुंबे वास्तव्यास आहेत. त्यांना हातभार म्हणून हॅपी क्लब फाउंडेशनच्या सहकार्याने यशोत्तम जनहित प्रतिष्ठनच्या वतीने दहा दिवस (९ ते १८ जून) सकाळी व संध्याकाळी मोफत जेवणाचे डबे देण्यात आले.

विभा गिरीश ट्रस्टचे गहिनिनाथ हुमे, तुकाराम फाउंडेशनचे कैलास दळवी यांनी या उपक्रमाचे संयोजन केले होते. हॅपी क्लब फाउंडेशनचे कुलदीपक चौडेकर, विघ्नेश अय्यर, रोहन मोरे यांचे सहकार्य लाभले.

My Pune Edition
Jun 19, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## 5th June 2021 : World Environment Day : Tree Planting on behalf of Yashottam Janhit Pratishthan

Tree Planting is a need of the hour. The purpose behind celebrating Environment day is to create environment day is every human being. On behalf of **"Yashottam Janhit Pratishthans"**, tree were planted in Ramdara area of Loni Kalbhor on 5th June like Amla, Wad, Neem, Pimpal, Almond were planted during this time.






## 25 May 2021 : Distribution of vitamin drink powder and masks to the slum dwellers

Citizens and children need a nutritious diet during the corona epidemic. For that purpose, on behalf of **"Yashottam Janhit Pratishthans"**, free vitamin powder and masks were distributed to the working class and children living in Kawade nagar area of Ghorpadi, Pune








प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

27 May 2021

### कवडेनगर येथे जीवनसत्वयुक्त पेय वाटप

**हडपसर, दि.२६ (प्रतिनिधी) -** करोना महामारीच्या काळात नागरिकांना व मुलांना जीवनसत्व युक्त आहार गरजेचा आहे. त्या हेतूने यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने कवडेनगर परिसरातील कामगार तसेच मुलांना जीवनसत्वयुक्त पेय पावडर व मास्कचे वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, गहिनिनाथ हुमे, महादेव जाधव, करण परदेशी आदी या वेळी उपस्थित होते. प्रतिष्ठानच्या वतीने वेगवेगळे प्रबोधनात्मक उपक्रमही राबविले जातात, असे नितीन वाबळे यांनी सांगितले.

प्रभात Thu, 27 May 2021
https://epaper.eprabhat.net/c/6(

## 20 May 2021 : Free Distribution of clothes to needy and poor citizens living in slum areas

Citizens are facing many problems due to lockdown in corona period. Citizens and children living in slum area need clothes On behalf 0f **"Yashottam Janhit Pratishthans"**, clothes were distributed to citizens and children of 100 familes living in slum areas in Kawadenagar area of Ghorpadi, Pune





## 7 May 2021 : Free distribution of saffron mangoes

The number of corona patients is increasing in pune city Due to the lockdown, the hands of the citizens in the slum area not working. Now in the mango season. In order to make the citizens and children enjoy eating mangoes, **"Yashottam Janhit Pratishthans"** distributed free saffron mangoes to 100 Families and children from slum area of Nigdenagar, Ghorpadi, Pune





## 02 May 2021 : Distribution of free groceries and masks to the needy and poor citizens who lost their jobs during the Corona period

Many citizens have lost their jobs in the second wave of corona. So they have to face many problems. **"Yashottam Janhit Pratishthan"** distributed free groceries and masks to needy and poor families living in Mata Ramainagar, Subhashnagar and Nigadenagar areas of Hadapsar, Pune






लोकमत 8 May 2021

न्यूज inbox

### गरीब, गरजूंना मोफत मास्क, किराणा वाटप

हडपसर : 'यशोत्तम जनहित प्रतिष्ठान'च्या वतीने हडपसर येथील सुभाषनगर, माता रमाईनगर व निगडे नगर परिसरातील रोजगार गमाविलेल्या गरजू व गरिब नागरिकांना मोफत मास्क व किराणा साहित्याचे वितरण करण्यात आले. जरीया फांऊडेशनच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, गहिनीनाथ हुमे, महाराष्ट्र दलित सेवा संघटनेचे अध्यक्ष सुभाष सरोदे, कुमार ठाकुर, भिमाशंकर माने आदि या वेळी उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 2 May 08, 2021
Powered by: erelego.com

सकाळ 19/05/2021

### यशोत्तम जनहित प्रतिष्ठानतर्फे किराणा साहित्य

घोरपडी : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक नागरिकांना बेरोजगारीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे, हाताला काम नसल्यामुळे त्यांची उपासमार होऊ लागल्याने यशोत्तम जनहित प्रतिष्ठान व विभा गिरीश ट्रस्ट यांच्या वतीने येथील सुभाषनगर, माता रमाईनगर व निगडे नगर परिसरातील रोजगार गमाविलेल्या गरजूंना किराणा साहित्याचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, ट्रस्टचे अध्यक्ष गहिनीनाथ हुमे, महाराष्ट्र दलित सेवा संघटनेचे अध्यक्ष सुभाष सरोदे, कुमार ठाकूर, भीमाशंकर माने आदी मान्यवर उपस्थित होते.

Pune, HadapsarToday
19/05/2021 Page No. 3

## 14 March 2021 : Free distribution of groceries to needy and poor citizens

The number of corona patients has been increasing over the past few day. Many citizens living in slum areas do not have employment. Therefore, in collaboration with them, **"Yashottam Janhit Pratishthan"** distributed groceries to the needy and poor citizens of Keshavnagar, Pune





## 17th Jan 2021 : Distributed of school materials to needy and poor school children

Many needy and poor students do not have access to educational materials. The teachers of the school said that the initiative of providing educational materials to the students on behalf **"Yashottam Janhit Pratishthan"** commendable.

School books were distributed to student at Swami Vivekananda Shikshan Sansthas Prithviraj Kapoor Memorials High school in loni kalbhor, Dist- Pune






वाघोली बुलेटीन 20 Jan 2021

# यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**पुणे : प्रतिनिधी**

अनेक गरजू व गरिब विद्यार्थ्यांची शैक्षणीक साहित्य घेण्याची ऐपत नाही. त्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य मिळावे या हेतूने यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे शाळेतील शिक्षकांनी सांगीतले.

लोणी काळभोर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पृथ्वीराज कपुर मेमोरीअल हायस्कूलमध्ये प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका पोर्णिमा शेवाळे, पर्यवेक्षक शरद शिंदे, शिक्षक संजीवनी बोरकर, के. के. बोरकर, गहिनिनाथ हुमे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. गरजू व गरीब शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक ती शैक्षणीक मदत करण्याचे काम यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने केले जात असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे यांनी यावेळी सांगीतले.

## 13th December 2020 : Blood donation camp

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges blood donation camp every year. 13th Dcember 2020 there was blood donation camp arranged in Poona blood Bank, Hadapsar, Pune. Several citizens participated in this blood donation camp.







सकाळ 14 Dec 2020

**घोरपडी :** विभा गिरीश ट्रस्ट, यशोत्तम जनहित प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने व दत्ता कांबळे युवा मंच यांच्या सहभागाने हडपसर येथील पूना ब्लड बँक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. परिसरातील नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत उत्स्फूर्तपणे शिबिरात सहभाग घेतला. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष गहिनीनाथ हुमे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, युवा मंचचे अध्यक्ष दत्ता कांबळे, धम्मानंद क्षीरसागर, कुमार चक्रे, श्रीधर जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले. मागील काही दिवसांपासून राज्यामध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. तो भरून काढण्यासाठी शिबिर आयोजित केल्याचे आयोजकांनी या वेळी सांगितले.

## 4th Dec 2020 : Distribution of warm clothes to the needy and poor citizens

Many extremely poor citizens live the Mata ramainagar slum in Hadapsar, Pune. Many citizens here did not have warm clothes to protect themselves from the cold. Therefore, on behalf of **"Yashottam Janhit Pratishthan"** warm blankets were distributed to 100 citizens







**6 Dec 2020**

वाघोली बुलेटीन

# यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने गरजूंना उबदार कपड्यांचे मोफत वाटप

**मुंढवा : प्रतिनिधी**

झोपडपट्टी भागात राहणारे अनेक नागरिक पत्र्याच्या शेडमध्ये राहतात. काहिंना थंडीच्या दिवसांमध्ये पांघरण्यासाठी उबदार कपडे नसतात. त्यांना थंडीपासून बचावासाठी उबदार कपडे मिळावेत या हेतूने हडपसर येथील माता रमाईनगर आणि परिसरातील नागरिकांना यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने मोफत उबदार कपड्यांचे वाटप करण्यात आले. ईगल बर्गमन इंडिया प्रा.लि. यांच्या सौजन्याने हा उपक्रम घेण्यात आला.




**यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने गरजूंना उबदार कपड्यांचे मोफत वाटप करण्यात आले.**

मागील काही दिवसांपासून थंडी वाढू लागली आहे. झोपडपट्टीतील नागरिकांना थंडीपासून बचावासाठी उबदार कपडे खरेदी करण्याची ऐपत नाही अशा गोरगरीब व गरजूंना उबदार कपडे उपलब्ध करून देण्याचे काम संस्थेच्या वतीने केले जात असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे यांनी सांगीतले.

यावेळी अखिल भारतीय राष्ट्रीय सम्राट सेनेचे अध्यक्ष भिमराव कडाळे पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, धम्मानंद क्षिरसागर, कुमार चक्रे, श्रीधर जाधव, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# 15th Sept 2020 : Tree Planting at ramdara in loni kalbhor

Plantation is need of care. On belhf of **"Yashottam Janhit Pratishthan"** trees were planted at ramdara in loni kalbhor. Local citizens and youth cooperated for the tree planting





## 3th Sept 2020 : Distribution of groceries and tree saplings to needy and poor citizens in corona crisis

Many families of the workers are living in and around the cemetery at plejan park, fatimanagar, Pune. To help them in the corona crisis **"Yashottam Janhit Pratishthan"** disrtibuted free groceries and tree saplings to 50 families






स्थापना १९३९ ७५ अमृतमहोत्सवी दैनिक

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

**7 Sept 2020**

## गरजूंना किराणा साहित्याचे वाटप

**पुणे :** यशोत्तम जनहित प्रतिष्ठनच्या वतीने फातिमानगर, प्लेजन पार्क येथील स्मशानभूमी परिसरात राहणाऱ्या गरजूंना माजी नगरसेवक प्रशांत म्हस्के यांच्या हस्ते किराणा साहित्य व वृक्षांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. ईगल बर्गमन इंडिया प्रा. लि. यांच्या सौजन्याने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी रवी सोनवणे, जीवन कांबळे, लक्ष्मण पाटील, संदीप लांडगे आदी उपस्थित होते. कोरोनामुळे अनेकांचे रोजगार बुडालेले आहेत. अशा अवस्थेत त्यांना मदत करण्याच्या हेतूने राबवण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत म्हस्के यांनी कौतुक केले.

# 23th July 2020 : Free distribution of health care kits to emergency workers during the corona epidemic

In Pune city Ghorpadi, B.T.Kawade road, Shaktinagar and Bhimnagar during the corona epidemic 110 essential service personal are performing their duties. They were given a health safety kit with two masks, three hand gloves and a sanitizer bottle each by **"Yashottam Janhit Pratishthan"** to take care of their health

.






बुलेटीन 24 July 2020

## यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना आरोग्य सुरक्षा कीट वाटप



यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने आरोग्य सुरक्षा कीट वाटप करण्यात आले

**पुणे - प्रतिनिधी**

कोरोना विपाणू संसर्गाची महामारी सुरू आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी भीती न बाळगता दक्षता घेतली पाहिजे. आपला परिसर स्वच्छ ठेवा, दिवसभर काम करून घरी गेल्यानंतर आंघोळ करावी, मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग असे शासनाने नियम घालून दिले आहेत, त्याचे पालन करा आणि इतरांनाही सांगा, असे मत ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त दयानंद सोनकांबळे यांनी व्यक्त केले.

यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने घोरपडी, भीमनगर, शक्तिनगर व बी. टी. कवडे रस्ता परिसरातील अत्यावश्यक सेवेतील ११० कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दोन मास्क, तीन हँन्डग्लोज व सॅनिटायझर असलेले सुरक्षा कीटचे वाटप करण्यात आले याप्रसंगी सोनकांबळे बोलत होते.

इगल बर्गमन इंडिया प्रा.लि. यांच्या सौजन्याने हा उपक्रम राबविण्यात आला. यशोत्तम जनहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे यांनी सांगीतले कि, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी शहराचे आरोग्य चांगले ठेवण्याचे काम करतात त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय चंदन, आरोग्य निरीक्षक संदिप रोकडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, मनपाचे कर्मचारी उपस्थित होते.

पुण्यनगरी 29 July 2020

## कोरोना रोखण्यासाठी स्वच्छता बाळगा : सोनकांबळे



**। हडपसर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणू संसर्ग महामारी रोखण्यासाठी आपण आपली काळजी घेऊन आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे, स्वच्छता कर्मचाऱ्यांनी भीती न बाळगता दक्षता घेतली पाहिजे. दिवसभर काम करून घरी गेल्यानंतर आंघोळ करावी, मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग असे शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, आपल्या आजूबाजूच्या इतरांनाही सांगा, असे मत ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त दयानंद सोनकांबळे यांनी व्यक्त केले. यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने घोरपडी, भीमनगर, शक्तिनगर व बी. टी कवडे रस्ता परिसरातील अत्यावश्यक सेवेतील ११० कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दोन मास्क, तीन हँन्डग्लोज व सॅनिटायझर बोटल असलेले कीट देण्यात आले. या वेळी सोनकांबळे बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चंदन, ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक संदिप रोकडे, प्रतिष्ठनचे अध्यक्ष नितीन वाबळे तसेच कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

वाबळे म्हणाले, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी शहराचे आरोग्य चांगले ठेवण्याचे काम करतात, त्यांनी आपल्या शरीराची काळजी घ्यावी स्वतः आरोग्याकडेही लक्ष द्यावे, असे सांगितले.

# 14th June 2020 : Workers who distributed free groceries during the corona period

Many citizens have lost their jobs in the Corona crisis. Although life has been restored for the last few days, the mercenaries are looking for employment. This sitution has created the illusion of their two-course meal. It is your responsibility to help them. **“Yashottam Janhit Pratishthan”** distributed free groceries to 50 such families in Keshavnagar, Pune






वाघोली बुलेटीन **17 June 2020**

## यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने गरजूंना किराणा साहित्याचे वाटप

**वाघोली : प्रतिनिधी**

“मदत नव्हे कर्तव्य” या सामाजिक उपक्रमाअंतर्गत केशवनगर येथील गरजू आणि गरीब कुंटुंबांना यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने मोफत किराणा साहित्याचे वितरण करण्यात आले. डेटा ब्रिज मार्केट रिसर्च प्रा. लि. यांच्या सौजन्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी पोलिस उपनिरीक्षक धिरज कांबळे, पोलिस नाईक उमेश गवळी, पश्चिम महाराष्ट्र शेतकरी संघटना युवक अध्यक्ष रवी राणा पवार, सामाजिक कार्यकर्ते सुखदेव नाना गायकवाड, दिलिप भंडारी, अनिल भांडवलकर, संगीता पारधे, वैशाली खुणे, गौरी मुर्ती, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदि उपस्थित होते.

केशवनगर येथील गरजू व गरीब ५० कुंटुंबाना किराणा साहित्य देण्यात आले. यावेळी प्रत्येकाने मास्क लावून सोशल डिस्टसिंगचे पालन केले.

प्रशासनाच्या नियमांचे पालन करून कोरोना आटोक्यात आणूया असे सामाजिक कार्यकर्ते सुखदेव गायकवाड यांनी यावेळी सांगीतले.

कोरोना संकटात अनेक नागरीकांचा रोजगार गेलेला आहे. मागील काही दिवसांपासून जनजीवन पुर्ववत होत असले तरी मोलमजूरी करणारी कुटुंबे रोजगाराच्या शोधात असून त्यांना दोन वेळच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा संकटांच्या प्रसंगी मानसाने एकमेकांना सहकार्य करून सावरण्याचे काम करणे आवश्यक असल्याचे यशोत्तम जनहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे यांनी सांगीतले.




यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने गरजू व गरीब कुटुंबांना मोफत किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

# 13th December 2019 : Blood donation camp

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges blood donation camp every year. 13th Dcember 2019 there was blood donation camp arranged in Aadrash vidyalay B.T. Kawade road, dalvinagar, Pune Several citizens participated in this blood donation camp.







पुण्य नगरी 15 Dec 2019

## बी. टी. कवडे रोड येथे रक्तदान शिबिर

**हडपसर** : बी. टी. कवडे रोड घोरपडी येथे विभा गिरीश ट्रस्ट व यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने कवडे रोडवरील आदर्श विद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सह्याद्री हॉस्पिटल, कर्वे रोडच्या सहकार्याने आयोजित या रक्तादान शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी साधना बँकेचे संचालक चंद्रकांत कवडे, अजित सिंग निर्माण, तानाजी रुके, शेषराव साळवे, संतोष घोडके, सुरेखा ढोरे, अभिषेक साळवे, कैलास दळवी, मुख्याध्यापक वाल्मीक बारवकर, विभा गिरीश ट्रस्टचे गहिनीनाथ हुमे, रंजना हुमे, रंगराज हुमे, यशोत्तम जनहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदी उपस्थित होते. रक्तदान ही काळाजी गरज आहे. आजच्या घडीला जेवढ्या रक्ताची गरज आहे. त्याप्रमाणात ते उपलब्द होत नाही. त्यामुळे ठिकठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले पाहिजे. नागरिकांनी रक्तदान करून एक महान कार्य करावे, असे आवाहन या वेळी आयोजकांकडून करण्यात आले.

पुढारी 15 Dec 2019

संक्षिप्त




बी. टी. कवडे रोड येथील रक्तदान शिबिरात सहभागी नागरिक.

## रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंढवा** : विभा गिरीश ट्रस्ट व यशोत्तम जनहित प्रतिष्ठनच्या संयुक्त विद्यमाने बी. टी. कवडे रोड येथील आदर्श विद्यालयात शुक्रवारी (दि१३) रक्तदान शिबिर घेण्यात आले. सह्याद्री हॉस्पिटल, कर्वे रोडच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिरात परिसरातील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. साधना बँकेचे संचालक चंद्रकांत कवडे, तानाजी रुके, अजित सिंग निर्माण, हेमराज कवडे, संतोष घोडके, ओंकार भडके, प्रमिला भडके, चंद्रशेखर पिसाळ, मुख्याध्यापक वाल्मिक बारवकर, सविता बारवकर, विभा गिरिश ट्रस्टचे गहिनीनाथ हुमे, रंजना हुमे, रंगराज हुमे, यशोत्तम जनहित प्रतिष्ठनचे सदस्य या वेळी उपस्थित होते.

## 13th Nov 2019 : Dentist guidance as well as free distribution of toothpaste and brushes to slum area school children on dental health

Tooth decay increasing school children. If you do not immediately notice the tooth worms, teeth need to be removed. Early diagnosis and treatment of an infected tooth can be saved early. Getting proper guidance on 'dental hygiene' for Adarsh Vidalaya, Dalvinagar, Ghorpadi, Pune school children will help to relieve tooth decay and other tooth complaints. Dentist Sonam shindes guided lecture and 1000 children were distributed free of toothpaste and brushes to the school by **"Yashottam Janhit Pratishthan"**






**लोकमत** 17 Nov 2019

### दातांसाठी कॅल्शियमचे सेवन अधिक करा

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंढवा : प्रत्येकाने दर वर्षी किमान एकदा दातांची तपासणी आणि क्लीनिंग करून घेणे आवश्यक आहे. तसेच, जेवणानंतर चूळ भरली पाहिजे. दातांना निरोगी ठेवण्यासाठी शालेय मुलांबरोबर सर्वांनीच सकाळी व सायंकाळी असे दिवसातून दोन वेळा दात स्वच्छ केले पाहिजेत. निरोगी दातांसाठी कॅल्शियम असलेल्या पदार्थांचे सेवन करा आणि दर सहा महिन्यांनी ब्रश बदलणे गरजेचे आहे. दातांचे आरोग्य आपल्याच हातात आहे, असे मत दंतरोगतज्ज्ञ डॉ. सोनम शिंदे यांनी व्यक्त केले.

आदर्श विद्यालयामध्ये 'यशोत्तम जनहित प्रतिष्ठान'च्या वतीने 'दातांचे आरोग्य' या विषयावर मुलांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सहायक पोलीस आयुक्त सुनील कलगुटकर, धर्मादाय अधीक्षक आर. एस. गायकवाड, डॉ. अनुजा शिंदे, व्ही. एस. बारवकर, नितीन वाबळे उपस्थित होते.

◆ आर. एस. गायकवाड म्हणाले, की निरोगी शरीर ही सर्वांत मोठी संपत्ती आहे. निरोगी आरोग्य राहण्यासाठी नियमित व्यायाम आणि संतुलित आहार घेण्याची सवय लावून घ्या. जंकफूड, फास्टफूडपेक्षा घरचे जेवण घेण्याला प्राधान्य द्या. शालेय जीवनामध्ये या सवयी लावून घेतल्या, तर भविष्यात निरोगी राहण्याकरिता तुम्हाला मदतच होईल.

Hello Pune
Page No. 9 Nov 17, 2019
Powered by: erelego.com

**सकाळ** 16 Nov 2019



घोरपडी : 'दातांचे आरोग्य' विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सोनम शिंदे.

### कॅल्शियमयुक्त पदार्थांचे सेवन आवश्यक : डॉ. शिंदे

घोरपडीतील आदर्श विद्यालयात 'यशोत्तम'तर्फे कार्यशाळा

**घोरपडी, ता. १५ :** प्रत्येकाने दरवर्षी किमान एकदातरी दातांची तपासणी करणे आवश्यक असून, जेवणानंतर चूळ भरली पाहिजे. दातांना निरोगी ठेवण्यासाठी शालेय मुलांबरोबर सर्वांनीच दिवसातून दोन वेळा दात स्वच्छ केले पाहिजेत. निरोगी दातांसाठी कॅल्शियम असलेल्या पदार्थांचे सेवन करा, असे प्रतिपादन दंतरोगतज्ज्ञ डॉ. सोनम शिंदे यांनी केले.

बी. टी. कवडे रस्ता येथील आदर्श विद्यालयामध्ये यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने 'दातांचे आरोग्य' या विषयावर मुलांसाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. शिंदे बोलत होत्या. या वेळी प्रतिष्ठानच्या वतीने सर्व मुलांना ब्रश आणि टुथपेस्टचे मोफत वाटप करण्यात आले.

या प्रसंगी सहायक पोलिस आयुक्त सुनील कलगुटकर, धर्मादाय अधीक्षक आर. एस. गायकवाड, डॉ. अनुजा शिंदे, मुख्याध्यापक व्ही. एस. बारवकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदी उपस्थित होते. या वेळी आर. एस. गायकवाड म्हणाले की, जंकफूड, फास्टफूडपेक्षा घरचे जेवण घेण्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. शालेय जीवनामध्ये या सवयी लावून घेतल्या, तर भविष्यात निरोगी आयुष्य राहण्यासाठी मदतच होईल. शिक्षक बाबासाहेब भोर यांनी आभार मानले.

Pune, HadapsarToday
16/11/2019 Page No. 4

# 28th June 2019 : Free medication for devotees in Palkhi festival

On behalf of 'Saint Dnyaneshwar Maharaj' and 'Sant Tukaram Maharaj', Palakhi the **"Yashottam Janhit Pratishthan"** has given free Medicine treatment at Hadapsar, Pune Dr. Dnyaneshwar Shinde, Dr. Parag Shingote, Dr. Prakash Gunjal, Dr. Anand Kamble, Dr. Pradeep Patil inspected the patients and gave them medicines.







पुण्यनगरी 29 June 2019

## विठ्ठलाच्या जयघोषाने हडपसरनगरी दुमदुमली

### भाविक भक्तिरसात चिंब | तुकोबा, माउलींच्या पालखींचे स्वागत

। हडपसर : प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे हडपसरमध्ये भक्तांकडून जंगी स्वागत करण्यात आले. सकाळी साडेआठच्या सुमारास माउलींच्या पालखीचे हडपसरला आगमन झाले. गाडीतळ येथील विसावा सभामंडपात माउलींची पालखी ठेवण्यात आली. यावेळी विठुनामाचा जयघोष करीत पालखी सासवडच्या दिशेने मार्गस्थ झाली.

अकरा वाजता जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे गाडीतळावर आगमन होताच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. महिला, वृद्ध, लहानथोरांनी पालखीचे दर्शन घेतले. हडपसर पोलीस स्टेशनसमोर संत तुकाराम महाराज यांची पालखी विसावा मंडपात दर्शनासाठी दोन तास ठेवण्यात आली होती. दुपारी एकच्या सुमारास लोणी काळभोरच्या दिशेने तुकाराम महाराज यांच्या पालखीचे हडपसरमधून प्रस्थान झाले.

यावेळी हडपसर येथे ठिकठिकाणी अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील तसेच भक्तांकडून दोन्ही पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

वैदुवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे शहर उपाध्यक्ष तुकाराम शिंदे यांनी वारकऱ्यांसाठी मोफत औषधोपचार उपलब्ध करून दिले. यावेळी डॉ. पराग शिंगोटे, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. गणेश शिंदे उपस्थित होते. यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने वारकऱ्यांची मोफत तपासणी करून औषधे देण्यात आली.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, डॉ. प्रकाश गुंजाळ, डॉ. आनंद कांबळे, डॉ. प्रदीप पाटील, अश्विनी कुतवळ, किरण कुतवळ, पार्थ वाबळे उपस्थित होते.

नगरसेवक संजय घुले यांच्या वतीने वारकऱ्यांना फराळ वाटप करण्यात आले. यावेळी सचिन घुले, उमेश चव्हाण, योगेश सूर्यवंशी उपस्थित होते.

नगरसेवक मारुती आबा तुपे यांच्या वतीने वारकऱ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजप ओबीसी सेल प्रदेश उपाध्यक्ष विकास रासकर आदी उपस्थित होते. नगरसेवक योगेश ससाणे यांच्या वतीने वारकऱ्यांना मोफत औषधे वाटप करण्यात आले. नगरसेवक प्रमोद भानगिरे यांच्या वतीने फराळ वाटप करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हडपसर विधानसभा कार्याध्यक्ष आबा कापरे, माजी नगरसेविका विजया कापरे, कमलेश कापरे यांच्या वतीने गुडदाणी, फराळ वाटप करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते सुनील कांबळे मंत्री मार्केट यांच्या वतीने फराळ वाटप करण्यात आले. शिवसेनेचे संजय सपकाळ, अजय सपकाळ, माजी आमदार महादेव बाबर यांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आले. माजी महापौर वैशाली बनकर, माजी नगरसेवक सुनील बनकर यांच्या वतीने फराळ, औषधे वाटप करण्यात आले होते. ज्ञानदीप बहुउद्देशिय सामाजिक विकास संस्था व संविधान सोशल फाउंडेशनच्या वतीने फराळ वाटप करण्यात आले. यावेळी लिंबोनी वाघमारे, सिद्धार्थ वाघमारे, आशा सावंत, विजय वाघमारे उपस्थित होते. मनसे नगरसेवक साईनाथ बाबर, सन्नी लांडगे यांच्या वतीने कापडी पिशव्या, पाणी वाटप करण्यात आले. हडपसरमध्ये विविध संघटनांकडून केळी, गुडदाणी, लाडू, पोहे, चहा, पाणी, कापडी पिशव्या, शेंगदाणे आदींचे वाटप करण्यात आले. हरिनामाचा जयघोष करीत दोन्ही पालख्यांना भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला.

हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, सहायक पोलीस आयुक्त समीर शेख व पोलीस अधिकारी यांनी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

सकाळ 29 June 2019

## वानवडी, घोरपडी परिसरात खाद्यपदार्थांचे वाटप



काळूबाई चौक : वारकऱ्यांना फराळ वाटप करताना मान्यवर.

**घोरपडी :** वानवडी व घोरपडी परिसरांत वारकऱ्यांना विविध संस्थांच्या वतीने खाद्यपदार्थांसह विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

**लक्ष्य प्रतिष्ठानतर्फे गुडदाणीवाटप**

फातिमानगर चौकात नगरसेविका कालिंदा पुंडे, नगरसेवक धनराज घोगरे यांच्या उपस्थितीत लक्ष्य प्रतिष्ठानच्या वतीने वारकऱ्यांना गुडदाणीचे वाटप करण्यात आले. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश पुंडे, जोगिंदर रपता, रमेश पुंडे, जितेंद्र जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच पालखी गेल्यानंतर प्रतिष्ठानच्या वतीने फातिमानगर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सर्व कार्यकर्त्यांनी रस्त्यावरील कचरा गोळा केला.

काळूबाई चौकामध्ये विशाल कवडे यांच्या वतीने वारकऱ्यांना १० हजार चिक्कीचे पॅकेट वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका सुरेखा कवडे, चंद्रकांत कवडे, काका पवार, शेषराव साळवे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच स्वीकृत नगरसेवक प्रमोद कामठे यांच्या वतीने वारकऱ्यांना मोफत पाण्याच्या बॉटल्स देण्यात आल्या. या वेळी सचिन शेदोळे, विकास कवडे, संदीप तावडे, सचिन तावडे, अविनाश डोमसे, सचिन दळवी व बालाजी प्रतिष्ठानचे आणि शिवभीम प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**राष्ट्रवादीतर्फे औषधोपचार**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ओबीसी सेलचे पुणे शहराचे उपाध्यक्ष तुकाराम शिंदे यांनी वारकऱ्यांसाठी मोफत औषधोपचार उपलब्ध करून दिले होते. डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. पराग शिंगोटे, डॉ. गणेश शिंदे आदींनी वारकऱ्यांची तपासणी केली. विभा गिरीश ट्रस्टच्या वतीने गहिनीनाथ हुमे व ट्रस्टच्या सदस्यांनी काळूबाई चौकात वारकऱ्यांना चहा व फळांचे वाटप केले. यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने वारकऱ्यांची मोफत तपासणी करून त्यांना आवश्यक औषधे देण्यात आली. डॉ. प्रकाश गुंजाळ, डॉ. आनंद कांबळे, डॉ. प्रदीप पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, अश्विनी कुतवळ, किरण कुतवळ, पार्थ वाबळे या वेळी उपस्थित होते.

Pune, HadapsarToday

## 13th March 2019 - World Women's Day

On the occasion of World Women's Day, a Masik Pali awareness campaign was organized at Vitthalrao Shivarkar Secondary and Higher Secondary School, Bhairobanala, Wanwadi, Pune on behalf of **"Yashottam Janhit Pratishthan"**. Inspirational lecturer for women, Radhika Rane-Dojoday interacted with the students on the importance of sanitary napkins and resolved their doubts. Free sanitary napkins were distributed to the students at this time






**सकाळ** **18 March 2019**

# मुलींनी आई, मैत्रिणींशी मोकळेपणाने संवाद साधावा : राणे



वानवडी : जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन शिबिरात मुलींच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

## शिवरकर विद्यालयात 'हॅपी पीरियड टाइम'वर चर्चासत्र

**घोरपडी, ता. १७ :** किशोरवयीन मुलींनी आई, बहीण आणि मैत्रीणींशी मनमोकळेपणाने संवाद साधण्याची गरज आहे. मासिक पाळीदरम्यान हिरव्या पालेभाज्या आणि बीट यांचा आहारामध्ये समावेश असावा, तसेच मांसाहार आणि खारट पदार्थ खाणे टाळावे. मासिक पाळीच्या कालावधीत न्यूनगंड न बाळगता त्याकडे 'हॅपी पीरियड टाइम' म्हणून पाहणे आवश्यक आहे, असे मत व्याख्यात्या राधिका राणे-डोईजोडे यांनी व्यक्त केले.

यशोत्तम जनहित प्रतिष्ठान व लायन्स क्लब ऑफ पुणे अग्रसेन यांच्या संयुक्त विद्यमाने वानवडी, भैरोबानाला येथील विठ्ठलराव शिवरकर विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त मुलींसाठी 'हॅपी पीरियड टाइम' यावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी राणे बोलत होत्या.

शिबिरात मुलींनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना राणे यांनी समर्पक उत्तरे दिली. या वेळी विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीनचे मोफत वाटप करण्यात आले.

याप्रसंगी क्लबचे अध्यक्ष राजेश अग्रवाल, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे, क्लबचे सदस्य सुभाष गोयल, संगीता अग्रवाल, रीटा अग्रवाल, विद्यालयाचे प्राचार्य एल. के. वाघुले, शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Pune, HadapsarToday
18/03/2019 Page No. 6

# 24th January 2019 : Free Health Checkup Camp

**“Yashottam Janhit Pratishthan”** organized health checkup camp 24 Jan 2019 at karkhel, Tal - Baramati, Dist - Pune, In this camp blood pressure, sugar level, eyes, nose, throat, bones checkup was done. Dr. guided citizens on diseases cure and precaautions. This check-up was free of cost for all citizens.







सकाळ 30 Jan 2019

## कारखेलमधील शिबिरात २०० जणांची तपासणी

उंडवडी, ता. २९ : कारखेल (ता. बारामती) येथे स्व. उत्तम सीताराम वाबळे (गुरुजी) यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे आयोजन यशोत्तम 'जनहित प्रतिष्ठान'च्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात २०० नागरिकांची तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूचे निदान झालेल्या ९ नागरिकांना मोफत शस्त्रक्रियेसाठी हडपसर येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयात पाठविण्यात आले.

याप्रसंगी विल्लू पूनावाला हॉस्पिटलचे जनरल सर्जन डॉ. किरण शहा, जिल्हा परिषदेचे सदस्य भरत खैरे, बारामती पंचायत समितीच्या उपसभापती शारदा खराडे, आत्माराम वाबळे, सुरेश वनकुद्रे, नितीन चौधर, बापूराव गवळी, संदीप वाबळे, अशोक लोंढे, उत्तम भोसले, अशोक भोसले व प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन वाबळे आदी उपस्थित होते.

डॉ. शहा म्हणाले, ''प्रत्येक नागरिकाने वर्षातून किमान एकदा संपूर्ण शरीराची आरोग्य तपासणी करून घेण्याची गरज आहे.''

विल्लू पूनावाला हॉस्पिटलचे डॉ. किरण शहा, डॉ. नकुल शहा, डॉ. सोनम शिंदे, डॉ. शर्वष्ठी वलाडे, पूजा कुचेकर, वर्षा चव्हाण, माधुरी शिंदे, अमित चौरे, अभिषेक नेयसे, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाचे डॉ. आम्रपाली बोबडे, संजय कुलकर्णी, नेहा टिळेकर व शुभदा शिंदे यांनी नागरिकांची तपासणी केली.

Pune, Baramati-Today
30/01/2019 Page No. 5



पुढारी 26 Jan 2019

कारखेल येथे मोफत आरोग्य शिबिराला उपस्थित रुग्ण.

## कारखेल येथे मोफत आरोग्य तपासणी

उंडवडी : कारखेल (बारामती) येथे स्व. उत्तम सीताराम वाबळे यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे आयोजन यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी सुमारे २०० नागरिकांची तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूचे निदान झालेल्या ९ रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी हडपसर येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयात पाठविण्यात आले. याप्रसंगी विल्लू पूनावाला हॉस्पिटलचे जनरल सर्जन डॉ. किरण शहा, पंचायत समितीच्या उपसभापती शारदा खराडे, नितीन वाबळे उपस्थित होते.

डॉ. नकुल शहा, डॉ. सोनम शिंदे, डॉ. शर्वष्ठी वलाडे, पूजा कुचेकर, वर्षा चव्हाण, माधुरी शिंदे, अमित चौरे, अभिषेक नेयसे, डॉ. आम्रपाली बोबडे, संजय कुलकर्णी, नेहा टिळेकर व शुभदा शिंदे यांनी नागरिकांची तपासणी केली.

My Gramin Edition
26 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# 13th December 2018 - Blood donation camp

**“Yashottam Janhit Pratishthan”** arranges blood donation camp every year. 13th Dcember 2018 there was blood donation camp arranged in Aadrash vidyalay B.T. Kawade road, dalvinagar, Pune Several citizens participated in this blood donation camp.







**सकाळ** 21 Dec 2018

## आदर्श विद्यालयात रक्तदान शिबिर

**घोरपडी, ता. २०** : विभा गिरीश ट्रस्ट, यशोत्तम जनहित प्रतिष्ठान व सहयोगी स्ट्रस्टच्या सहकार्याने बी. टी. कवडे रस्ता येथील आदर्श विद्यालयात रक्तदान शिबिर झाले. मोहन गुजर, ज्योती गुजर व त्यांचा मुलगा शुभम यांनी रक्तदान केले. सह्याद्री हॉस्पिटलमधील डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांचे शिबिरासाठी विशेष योगदान लाभले. नगरसेविका लता धायरकर, साधना बँकेचे संचालक चंद्रकांत कवडे, राजेश कवडे, दिलीपसिंग घोसल, काका पवार, संस्थापक त्र्यंबकराव बारवकर, मुख्याध्यापक वाल्मीक बारवकर, प्रदीप काळेल, तानाजी रुके, शेषराव साळवे, हेमराज कवडे, किरण हेबाडे, संतोष घोडके, कैलास दळवी, विभा गिरीश ट्रस्टचे गहिनीनाथ हुमे, रंजना हुमे, रंगनाथ हुमे, नितीन वाबळे आदी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
21/12/2018 Page No. 8

**लोकमत** 16 Dec 2018

## आदर्श विद्यालयात रक्तदान शिबिर

**हेच श्रेष्ठ दान** : विभा गिरीश ट्रस्ट व यशोत्तम जनहित प्रतिष्ठान

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंढवा** : घोरपडी येथील विभा गिरीश ट्रस्ट, यशोत्तम जनहित प्रतिष्ठान व सहयोगी स्ट्रस्टच्या सहकार्याने बी. टी. कवडे रोड येथील आदर्श विद्यालयात गुरुवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सह्याद्री हॉस्पिटल, कर्वे रोडच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिरात परिसरातील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

यावेळी नगरसेविका लता धायरकर, साधना बँकेचे संचालक चंद्रकांत कवडे, राजेश कवडे, दिलीप सिंग घोसल, काकासो पवार, आदर्श शाळेचे त्र्यंबकराव बारवकर, मुख्याध्यापक वाल्मीक बारवकर, प्रदीप काळेल, तानाजी रुके, शेषराव साळवे, हेमराज कवडे, किरण हेबाडे, संतोष घोडके, कैलास दळवी, विभा गिरीश ट्रस्टचे गहिनीनाथ हुमे, रंजना हुमे, रंगनाथ हुमे, जनहित प्रतिष्ठानचे नितीन वाबळे उपस्थित होते.



घोरपडी-बी. टी. कवडे रोड येथील आदर्श विद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

### एकाच घरातील तिघांचे रक्तदान

बी. टी. कवडे रोड येथील मोहन गुजर व ज्योती गुजर हे दांपत्य व त्यांचा मुलगा शुभम या तिघांनी यावेळी रक्तदान केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे त्यांनी सांगितले. या तिघांच्या उपस्थितीने सर्वांनी त्यांचे यावेळी कौतुक केले.

Hello Pune
Page No. 9 Dec 16, 2018
Powered by: erelego.com

# 5th June 2018 - Tree plantation

**"Yashottam Janhit Pratishthan"** arranges tree plantation every year. 5th June 2018 there was tree plantation arranged in Ramtekdi, Hadpsar, Pune. Citizens of the area also participated in the camp. There are 300 hundred trees planted on this day



# 13th December 2017- Blood donation camp

**“Yashottam Janhit Pratishthan”** arranges blood donation camp every year. 13th Dcember 2017 there was blood donation camp arranged in Aadrash vidyalay B.T. Kawade road, dalvinagar, Pune several citizens participated in this blood donation camp.







**पुढारी 23 Dec 2017**

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**मुंढवा** : विभा गिरीश ट्रस्ट पुणे व यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने आदर्श विद्यालय, दळवीनगर, बी. टी. कवडे रस्ता येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील २८ नागरिकांनी या शिबिरामध्ये रक्तदान केले. संस्थांच्या वतीने रक्तदाते व शालेय विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले.

नगरसेवक उमेश गायकवाड, नगरसेविका हिमाली ताई कांबळे, साधना बँकेचे संचालक चंद्रकांत कवडे, मुख्याध्यापक व्ही.एस.बारवकर, गहिनीनाथ हुमे, रंगनाथ हुमे, कविता बारवकर, रंजना हुमे, नितीन वाबळे, आदर्श विद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

My Pune
Page No. 04 Dec 23, 2017
Powered by: erelego.com

## 3rd August 2016 - Students given water bottles and sport material

**"Yashottam Janhit Pratishthan"** distributed water bottels and sport material to the New English school Karkhel, Baramati, dist-Pune. Students in school are living far from the school there is no proper drinking water systen in school so water bottle are given to every student of New English school Karkhel.







**सकाळ** 6 August 2016

# कारखेल येथे विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य

**उंडवडी, ता. ५ :** कारखेल (ता. बारामती) येथील न्यू इंग्लिश स्कूल व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने पाण्याच्या बाटल्या व क्रीडा साहित्याचा संच वाटण्यात आला.

"शाळा व महाविद्यालयीन जीवनात मुलांनी चांगला अभ्यास करण्याची गरज आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून आई-वडिलांचे नाव उज्वल करावे," असे मत वडगाव निंबाळकरचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांनी या वेळी व्यक्त केले. मुलींच्या छेड काढण्याच्या प्रकरणाची गंभीर दखल घेत रोडरोमिओंवर पोलिस कारवाई सुरू आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल वाबळे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नितीन वाबळे, अशोक वालगुडे, चंद्रशेखर भांगे, आत्माराम वाबळे, सरपंच कांतीलाल भापकर, मुख्याध्यापक रघुनाथ साळुंखे आदी उपस्थित होते. राम कणसे यांनी सूत्रसंचालन केले. ए. एस. क्षीरसागर आणि एन. एन. जगताप यांनी आभार मानले.




कारखेल (ता. बारामती) : न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना यशोत्तम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने क्रीडा साहित्य आणि पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करताना मान्यवर.

## 5th June 2016 - Tree plantation

5th June is celebrated world Environment day. 5th June 2016 there was tree plantation conducted on B.T. Kawade road, Ghorpadi, Pune serve no. 50 by **"Yashottam Janhit Pratishthan"** There are 200 trees planted and they are being taken care of.




**लोकमत 8 June 2016**

**क्रीडांगणाभोवती वृक्षारोपण**

हडपसर : स्थानिक नगरसेवक, सावित्रीबाई फुले महिला ज्ञान विकास प्रतिष्ठान, माय पुणे फाउंडेशन व यशोतम जनहित प्रतिष्ठानच्या वतीने बी. टी. कवडे रस्त्यावरील सर्व्हे नं. ५० येथील क्रीडांगणाभोवती वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक प्रशांत म्हस्के, नगरसेविका सुरेखा कवडे, रामचंद्र कुंभार, यशोतम जनहित प्रतिष्ठानचे नितीन वाबळे, चंद्रशेखर भांगे, अशोक बालगुडे, संदीप ढोले, राजेश पुजारी, सोमेश गालमिडे, अविनाश लांडगे, कालिदास थोरात, एम. ए. पिल्ले, एस. के. श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

## 3rd October 2015 - Help to drought Effected people

In the year of 2015 there was less rain in Maharashtra so farmers had to face drought. Many a farmers did suicide. Yashottam janhit pratishthan and other organizations helped 'Naam' foundation financially for drought effected people.





पुढारी 5 Oct 2015



रामटेकडी परिसरातील गणेश मंडळे व सामाजिक संस्थांनी दुष्काळग्रस्तांसाठी मदत म्हणून नाम फाउंडेशनला एक लाख एक हजार रूपयांचा धनादेश दिला.

### रामटेकडीतील संस्थांची दुष्काळग्रस्तांना मदत

**मुंढवा :** रामटेकडी आणि परिसरातील काही गणेश मंडळे व सामाजिक संस्थांनी संयुक्तपणे दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून एक लाख एक हजार रूपयांचा निधी नाम फाउंडेशनला दिला. वानवडी पोलिस ठाण्यामध्ये झालेल्या या कार्यक्रमात अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रकाश मुत्याल यांच्याकडे हा धनादेश सुपुर्त करण्यात आला. स्व. सुषमा सतिष लोंढे सामाजिक संस्था, साईनाथ मित्रमंडळ, वाहेगुरू अर्थमुव्हर्स, खालसा सिंग सेना, जनसेवा वस्ती विकास संस्था, अखिल सामाजिक एकता मंच ज्ञानदीप बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था व यशोत्तम जनहित प्रतिष्ठान आदि संस्थांनी नाम फाउंडेशनला मदत केली. सहाय्यक आयुक्त रविंद्र रसाळ, वानवडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक बी. एन. काळे, नगरसेवक सतिष लोंढे, चित्रा लोंढे, वैशाली शिंदे, बच्चनसिंग कल्याणी व कलमसिंग कल्याणी आदि या वेळी उपस्थित होते.

## 12th July 2015 - Fruits and fast-food given to devotees

Saint Dnyadneshwer and Jagatguru saint Tukaram maharaj palkhi comes to Hadapsar, Pune every year. **"Yashottam Janhit Pratishthan"** offered fruits and fasting foods to devotees participated in palkhi.




